# ‘मनरेगा’अंतर्गत जिल्हा परिषद शाळांचा भौतिक व गुणवत्तापूर्ण विकास- ‘पंचायत समिती शहादा’

आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाल्यास उद्या आपल्या देशाचे भविष्य उज्ज्वल होण्यात हातभार लागणार आहे. महाराष्ट्रातील बहुतांशी विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधून शिकत आहेत. या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी निर्माण व्हावी यासाठी शाळांचा परिसर सुंदर आणि स्वच्छ असणे आवश्यक आहे. स्वच्छ, सुंदर आणि हिरवाईने नटलेल्या परिसरात शिकणे आणि शिकवणे या दोन्ही प्रक्रिया आनंददायी होतील. अशा परिसरात दिवसभर मन प्रसन्न राहील. त्यामुळे मुले शाळेकडे आणि पर्यायाने शिक्षणाकडेही आकर्षित होतील. “महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या” माध्यमातून शाळांचा परिसर सुंदर बनवणे शक्य आहे. जिल्हा परिषद शाळांचा भौतिक विकास करण्याच्या दृष्टीने ‘महात्मा गांधी रोजगार हमी योजने’मार्फत करता येणारी पुढील १३ कामे उपयुक्त ठरू शकतात. ‘१ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार’ या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

- शाळेसाठी किचन शेड
- शाळा/अंगणवाडीच्या इमारतीसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग संरचना
- शाळा /अंगणवाडीच्या परिसरात शोषखड्डा
- शाळा/अंगणवाडीसाठी शौचालय
- शाळा/अंगणवाडीसाठी खेळाचे मैदान
- शाळा/अंगणवाडीला संरक्षक भिंत
- वृक्ष लागवड (बिहार पॅटर्न)
- शाळा/अंगणवाडीच्या परिसरात पेविंग ब्लॉक बसवणे.
- शाळा/अंगणवाडीच्या परिसरात सांडपाण्याचे नियोजन करण्यासाठी काँक्रिट नालीचे बांधकाम.
- शाळा/अंगणवाडीकडे येणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता सुधारणे.
- बोअरवेल पुनर्भरण (शाळा/अंगणवाडीत बोअर असल्यास)
- गांडूळखत प्रकल्प
- शाळा किंवा अंगणवाडी परिसरात विद्यार्थ्यांच्या मदतीने सेंद्रीय खत निर्मिती करणे (नाडेप कंपोस्ट)



वर दिलेली आवश्यक कामे ‘महात्मा गांधी रोजगार हमी योजने’मार्फत करून घेतली तर राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा तसेच अंगणवाड्यांचा भौतिक विकास होऊन त्यांचा परिसर सुंदर होण्यास मदत होईल.

या अनुषंगाने ‘पंचायत समिती शहादा’ व ‘ग्यानप्रकाश फाउंडेशन’ यांच्या माध्यमातून नियमितपणे होणाऱ्या ‘शैक्षणिक ग्रामसभे’मध्ये कृती योजना आराखड्यातून तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. यासाठी ‘गट विकास अधिकारी’ यांनीदेखील मार्गदर्शन केले. या ११ ग्रामपंचायतींमध्ये मिळून एकूण ६७ कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी २४ कामे या योजनेमार्फत प्रस्तावित करण्यात आली. या कामांपैकी २५% कामे पूर्ण झालेली असून ७५% कामे सुरु आहेत. पुढील काही कालावधीत ही सर्व कामेही पूर्ण होतील. पूर्ण होणाऱ्या कामामध्ये शाळेचे पेव्हर ब्लॉक, रेन वाटर हार्वेस्टिंग, खेळाचे मैदान या कामांचा मुख्यत्वे समावेश आहे. या योजनेच्या माध्यमातून काम पूर्ण करण्याचा हा नंदुरबार जिल्ह्यातील पहिलाच प्रयोग आहे. मात्र या माध्यमातून शाळांचा व अंगणवाड्यांचा भौतिक विकास साध्य होऊ शकतो हा विश्वास यंत्रणेला आणि पदाधिकाऱ्यांना मिळाला आहे. ‘पंचायत समिती शहादा’ येथील गट विकास अधिकाऱ्यांनी या कामांसाठी आता तालुक्यातील इतर १५ ग्रामपंचायतीची निवड केली आहे. तसेच हे काम जिल्ह्यात पुढे घेऊन जाण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्हा स्तरावर एकत्रित नियोजन करण्याची तयारीही दर्शवली आहे. नियमितपणे होणाऱ्या ‘शैक्षणिक ग्रामसभेचा’ शाळांच्या विकासात केवढा फायदा होऊ शकतो हेच या उदाहरणातून दिसून आले आहे.




